# जळगावात काँग्रेसचे खडसेंसमोर लोटांगण



**दहा जागांसाठी निवडणूक हा केवळ उपचार ठरत असून संचालक मंडळात सर्व खडसे समर्थक राहणार आहेत. त्यामुळे परत एकदा जिल्हा बँक ही एकनाथ खडसेंच्या मार्गदर्शनाखाली चालणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजप आणि काँग्रेस नेत्यांचे खडसेंसमोर लोटांगण सामान्य कार्यकर्त्यांना रूचलेले नाही.**

जळगाव जिल्हा बँकेची निवडणूकीच्या प्रचाराचा अंतीम टप्पा सुरू झाला असून निवडणुकीचे चित्र स्पष्ट होऊ लागले आहे. सहकार क्षेत्रातील आशियातील सर्वात मोठी बँक अशी एकेकाळी बिरूदावली मिळविणाऱ्या या बँकेवर अनेक वर्ष काँग्रेसने राज्य केले. जिल्हयातील काँग्रेसचे अस्तित्व लयाला गेल्यावर राष्ट्रवादीने बँकेवर बऱ्यापैकी जम बसवला होता. तर जिल्हयात भाजप भक्कम झाल्यानंतर बँक एकनाथ खडसेंच्या मार्गदर्शनाखाली भाजपच्या ताब्यात गेली होती.

एकनाथ खडसेंनी भाजप सोडल्यानंतर आता २१ नोव्हेंबरला बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक होत असून जिल्हयातील भाजपच्या साम्राज्याला तडे जाऊ लागले आहेत. गिरीश महाजन आपली प्रतिष्ठा पणाला लावून बँक भाजपच्या ताब्यात ठेवतील वाटत असताना महाजनांनी अर्ज माघारीच्या शेवटच्या क्षणी अत्यंत लाजीरवाण्या पध्दतीने सर्व उमेदवारांची माघार घेत बँकेतील पक्षाचे अस्तित्व संपवण्याचा प्रयत्न केला. यात सर्व पक्षीय पॅनेलच्या गोंडस नावाखाली चर्चेचे गुऱ्हाळ चालवत भाजपला बेसावध ठेवले. काँग्रेसने आपण भाजपसोबत जाणार नसल्याचे जाहीर केले. पाठोपाठ राष्ट्रवादीनेही भाजपसोबत जाणार नसल्याचे जाहीर करत भाजपला एकटे पाडले. अखेर शेवटच्या क्षणी उपलब्ध होतील त्यांनी अर्ज दाखल करत भाजपचे अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न केला. मात्र, उमेदवारांची निवडणूक लढण्याची मानसिकताच नसल्याने निवडणुकीतून माघार हाच पर्याय गिरीश महाजनांसमोर होता. ही परिस्थिती एकनाथ खडसेंनी निर्माण करत भाजपला सहजपणे गुडघे टेकायला लावले.

आज २१ पैकी ११ जागा या महाविकास आघाडीने जिंकल्या असून यात राष्ट्रवादीने सहा तर शिवसेनेने पाच जागा बिनविरोध जिंकल्या आहेत. उर्वरीत दहा जागांसाठी ३१ उमेदवार रिंगणात असले तरी अनेकांनी आता माघार घेत अन्य उमेदवारांना पाठींबा दिलेला दिसत आहे. उर्वरीत दहा जागांमध्ये सर्वच ठिकाणी खडसे समर्थक विजयी होतील अशी स्थिती निर्माण करण्यात खडसे यशस्वी झालेले दिसतात. या बँकेच्या निवडणुकीत प्रथम सर्वपक्षीय पॅनेल बनवताना

## राज्य परिक्रमा



■ विजय पाठक

काँग्रेसला दोन जागा देण्याचे अन्य पक्षांनी मान्य केले होते. यात चोपडयाची जागा ही बँकेचे विदयमान संचालक काँग्रेसचे डॉ. सुरेश पाटील यांच्यासाठी सोडण्यावर काँग्रेसचा आग्रह होता. मात्र, ही जागा खडसे समर्थक भाजपाचे घन:श्याम अग्रवाल यांना मिळावी यासाठी खडसे आग्रही होते. चर्चेची बोलणी फिसकटल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसने घन:श्याम अग्रवाल यांना राष्ट्रवादीत प्रवेश देऊन उमेदवारी दिली आणि काँग्रेसला धक्का दिला. पाठोपाठ भाजपातून राष्ट्रवादीत गेलेले माजी आमदार अरूण पाटील यांच्यासाठी काहींना माघार घ्यायला लावली गेली तर काँग्रेसचे सदस्यही नसलेले विनोद पाटील आणि शैलजा निकम हे मुळचे राष्ट्रवादीत असताना काँग्रेस उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत. जिल्हाध्यक्ष प्रदीप पवारांनीच ही उमेदवारी दिल्याने काँग्रेसमध्ये मोठया प्रमाणावर नाराजी असून पक्षात उभे दोन तट पडले आहेत. एकनाथ खडसेंसमोर पवारांनी लोटांगण घातल्याने ही स्थिती निर्माण झाली असल्याचे कार्यकर्त्यांचे नेत्यांचे म्हणणे असून प्रदेशाध्यक्षांकडे याबाबत तक्रारी गेल्या आहेत.

जिल्हयात काग्रेस मृतवत असताना पक्षाला नव संजीवनी देण्यासाठी प्रदेशाध्यक्षांनी जिल्हाध्यक्ष बदलून आक्रमक चेहऱ्याचे प्रदीप पवार यांची नियुक्ती केली. काँग्रेस स्वतंत्र निवडणुक लढवेल, भाजपसोबत जाणार नाही अशा घोषणा केल्या जात असताना अचानक काँग्रेसचे सदस्य नसणाऱ्यांना दिले गेलेले काँग्रेसचे तिकीट, विदयमान काँग्रेस संचालक डॉ. सुरेश पाटील यांना डावलणे ही उदाहरणे पाहता खडसेंसाठी केवळ मान हलवणारे होयबा पाठवण्याचा हा खेळ असून खडसेंसमोर लोटांगण घातल्याची टीका नव्या जिल्हाध्यक्षांवर होत असून अगोदरचे जिल्हाध्यक्ष बरे होते असे म्हणण्याची वेळ काँग्रेसवर आली.

बँकेच्या विदयमान अध्यक्ष रोहिणी खडसे यांच्या विजयात अडथळा होऊ शकणारी राष्ट्रवादीत गेले पंधरा वर्ष काम करणाऱ्या माजी महिला जिल्हाध्यक्षा कल्पना पाटील यांनी आपली उमेदवारी खडसेंच्या विनंतीनुसार मागे घेतली. त्यामुळे रोहिणी खडसेंचा विजयाचा मार्ग मोकळा झाला. आता दहा जागांसाठी निवडणुक हा केवळ उपचार ठरत असून संचालक मंडळात सर्व खडसे समर्थक राहणार आहेत. त्यामुळे परत एकदा जिल्हा बँक ही एकनाथ खडसेंच्या मार्गदर्शनाखाली चालणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजप आणि काँग्रेस नेत्यांचे खडसेंसमोर लोटांगण सामान्य कार्यकर्त्यांना रूचलेले नाही. विदयमान आणि माजी आमदारांनी बँकेतही संचालकपद मिळवायचे आणि दुसऱ्या, तिसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांनी केवळ सतरंजा उचलायच्या हे किती दिवस चालणार या कार्यकर्त्यांच्या प्रश्नाचे उत्तर आज तरी कोणत्याही पक्षाकडे नाही. काँग्रेसचे प्रदेश नेते जळगावातील गोंधळाकडे किती गंभीरपणे पाहतील याबाबत शंकाच आहे.

# साताऱ्यातील १४७ गावांमध्ये पाणीटंचाईची शक्यता

वार्ताहर/**कराड**

सातारा जिल्ह्यात सप्टेंबरअखेर सातारा, जावळी, कराड व वाई तालुक्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला असून पाटण, कोरेगाव, खटाव, माण, फलटण, खंडाळा व महाबळेश्वर तालुक्यांतील भूजल पातळी काहीशी खालावल्याने १४७ गावांत संभाव्य पाणीटंचाई जाणवण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सातारा जिल्ह्यातील कराड, जावळी, खंडाळा, खटाव, कोरेगाव, माण, सातारा व वाई तालुक्यांमध्ये निरीक्षण विहिरींच्या पाण्याच्या पातळीमध्ये शुन्य ते ०.४५ मीटर इतकी वाढ झाली आहे. मात्र महाबळेश्वर, पाटण व फलटण तालुक्यांमध्ये निरीक्षण विहिरींच्या पातळीमध्ये ०.६६ मीटर इतकी घट दिसत आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने जिल्ह्यातील सप्टेंबरअखेर पडलेल्या पावसामुळे झालेले पुनर्भरण व उपसा याचा अभ्यास करण्यासाठी १०६ निरीक्षण विहिरींची पाहणी केली होती. त्यामध्ये हे चित्र समोर आले आहे. १०६ विहिरींपैकी ४० विहिरींच्या पाणी पातळीमध्ये घट झाली आहे. खटाव तालुक्यातील ३१, माण-३०, फलटण-३०, कोरेगाव-२३, पाटण-२५, महाबळेश्वर-८ अशा एकूण १४७ गावांमध्ये संभाव्य पाणी टंचाईचे संकट आहे.

## उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय महापूजा

**सोलापूर :** कोरानाच्या संकटानंतर तब्बल दोन वर्षांनी पंढरपूरच्या श्री विठ्ठलाची कार्तिकी यात्रा पार पडत आहे. या कार्तिकी यात्रेची शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या हस्ते सोमवारी पहाटे दोन वाजता होणार आहे. यावेळी पालकमंत्री दत्ता मामा भरणे, मंदिर समितीचे अध्यक्ष ह-भ-प गहिनीनाथ महाराज औसेकर, नगराध्यक्ष तथा मंदिर समिती सदस्या साधना भोसले, जिल्हाधिकारी मिलींद शंभरकर उपस्थित रहाणार आहेत.

## महाराष्ट्र डायरी



### रंगहीन नागाला जीवदान

**चंद्रपूर :** येथील खापरी रस्त्यावरील अनिल साव यांच्या कुक्कुटपालन केंद्रात दुर्मिळ प्रकारचा अर्ध रंगहीन नाग साप आढळून आला असून त्याला सर्पमित्रांनी जीवदान दिले आहे. सदर साप चार फूट लांबीचा असून त्याची वनविभागाच्या कार्यालयात नोंद करुन त्याला त्याच्या संरक्षित अधिवासात सोडण्यात आले. या वेळी सर्पमित्र राज येरने, श्रीपद बाकरे, दीपक सगदेव उपस्थित होते.

### नगर परिषदेला स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कार

**चंद्रपूर :** स्वच्छ सर्वेक्षण २०२१, स्वच्छता मित्र सुरक्षा चॅलेंज आणि कचरामुक्त शहरांसाठीचे पुरस्कार जाहीर करण्यात येणार असून २० नोव्हेंबर रोजी दिल्ली येथे पार पडणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्याचे निमंत्रण भद्रावती नगर परिषदेला नुकतेच मिळाले आहे. 'स्वच्छ सर्वेक्षण २०२१' या पुरस्कारासाठी भद्रावती नगर परिषदेची निवड करण्यात आली आहे. विज्ञान भवन येथे पुरस्कार सोहळा-अमृत महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या पुरस्काराबद्दल नगराध्यक्ष अनिल धानोरकर, मुख्याधिकारी पिदुरकर यांचे अभिनंदन केले जात आहे.

### तणावामुळे आत्महत्या

**जळगाव :** शिवाजी चौकातील राहणाऱ्या इयत्ता १२ मधील विद्यार्थ्याने भागलपूर डाऊन एक्सप्रेसखाली झोकून देत आत्महत्या केल्याची घटना घडली. लोकेश संजय महाजन असे आत्महत्या करणाऱ्या मुलाचे नाव आहे. लोकेश हा सरदार जी जी हायस्कूलमध्ये इयत्ता १२ मध्ये शिकत होता. दिलेला अभ्यास पूर्ण न केल्याने भीतीने त्याने भागलपूर डाऊन एक्सप्रेसखाली आत्महत्या केली.

# अन्यायाविरोधात लढणारा आदिवासी नक्षली नाही

वार्ताहर/**नाशिक**/**लासलगाव**



अन्यायाविरोधात लढणारा आदिवासी नक्षली असू शकत नाही. शिवरायांचे राज्य भोसल्यांचे नव्हे, तर ते रयतेचे हिंदवी स्वराज्य म्हणून ओळखले जाते, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी रविवारी केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खा. शरद पवार हे दोन दिवसांच्या नाशिक दौऱ्यावर आले असून रविवारी सकाळी त्यांनी इगतपुरी तालुक्यातील सोनोशी गावात क्रांतिवीर राघोजी भांगरे यांच्या स्मारकाचे भूमिपूजन कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली. यावेळी व्यासपिठावर विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, मंत्री छगन भुजबळ, मंत्री जितेंद्र आव्हाड उपस्थित होते.

यावेळी बोलताना ते म्हणाले, पिढ्यान पिढ्या या देशाचा मूळ मालक असलेल्यांची अवस्था वाईट आहे. त्यांच्या परिस्थितीत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. आदिवासी समाजाची तरुण पिढी इथे आली याचा आनंद आहे. आदिवासींसाठी संघर्ष करावा लागेल. खरे तर अन्यायाविरोधात लढणारा आदिवासी नक्षली असू शकत नाही. पुढच्या आठवड्यात नक्षली भागात मी स्वतः जाणार आहे. तिथल्या तरुणांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले

दरम्यान, शेतकऱ्यांच्या ऊसाला योग्य दर मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने शेतीत बदल करत ऊसाला अधिक उतारा कसा मिळेल यासाठी दर्जेदार ऊस उत्पादनावर शेतकऱ्यांनी भर द्यावा तसेच कारखानदारी यशस्वी होण्यासाठी केवळ साखर उत्पादन न करता इथेनॉल, वीज आणि हायड्रोजन उत्पादन करावे असे प्रतिपादन शरद पवार यांनी केले. रानवड येथे स्व. अशोकराव बनकर नागरी सहकारी पतसंस्था पिंपळगाव बसवंत संचलित कर्मवीर काकासाहेब वाघ सहकारी साखर कारखाना लि. काकासाहेब नगर रानवड या कारखान्याचा ३९ वा गळीत हंगाम शुभारंभ त्यांच्या हस्ते संपन्न झाला त्यावेळी ते बोलत होते. नाशिक जिल्ह्यात राज्याच्या कारखानदारीचे नेतृत्व पूर्वी होत होते. कर्मवीर काकासाहेब वाघ यांनी राज्यातील कारखानादारांचे नेतृत्व केले. कुठलीही गोष्ट ठरविली ती योग्य असेल तर त्यात तडजोड करायची नाही असे काकासाहेब वाघ यांचे नेतृत्व होते. त्यांनी सुरू केलेला कारखाना हा बंद झाला आणि आता हा बंद पडलेला कारखाना सुरू करण्याची हिंमत आमदार दिलीप बनकर यांनी दाखविली ही अतिशय महत्त्वाची बाब असल्याचे ते म्हणाले.

# अमरावतीत हिंदुंची उत्स्फूर्त प्रतिक्रिया – चंद्रकांत पाटील

वार्ताहर/**पुणे**

त्रिपुरामध्ये घटना घडली की नाही हा प्रश्न आहे. पण त्यासाठी अमरावती, नांदेड, मालेगाव मध्ये अशांतता पसरवणे हे कितपत योग्य आहे. त्यामुळे अमरावतीमध्ये जे घडले ती, हिंदुंची उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती. अब हिंदू मार नहीं खाएगा, अशी प्रतिक्रिया भाजप प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रकांत पाटील यांनी दिली. पुण्यात आयोजित एका कार्यक्रमापूर्वी ते पत्रकारांशी बोलत होते. १९९३ च्या दंगलीत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी बोटचेपी भूमिका घेतली असती, तर मुंबईत हिंदू जिवंत राहिला नसता, असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

त्रिपुरामध्ये घटना काय घडली हे नीट कुणालाही माहिती नाही. त्यासंदर्भात एक व्हिडिओ बनवून व्हायरल केला जातो. त्यानंतर अमरावती, नांदेड, मालेगावमध्ये अशांतता पसरवली जाते. १५-२० हजार संख्येने रस्त्यावर उतरून माजी मंत्री जगदीश गुप्तांसह अनेकांची कार्यालयाची तोडफोड करायची. याचा काय संबंध आहे? त्यामुळे शनिवारच्या घटनेत भाजपचा हात असेल, तर त्यापूर्वीच्या तोडफोडीच्या घटनेत संजय राऊतांचा हात आहे का?, असा सवाल त्यांनी केला.

अमरावतीमध्ये शनिवारी जे घडले, ती अब हिंदू मार नहीं खाएगा, अशी एक स्वाभाविक प्रतिक्रिया होती. यातून चिथावणी देण्याचा विषय येत नाही, तर खऱ्याला खरं म्हणणे ही आमची संस्कृती आहे. जसे आम्ही रा. स्व. संघाचे स्वयंसेवक आहोत, तसेच हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंना वंदन करणारे कार्यकर्ते ही आहोत. हिंदूहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी १९९३ च्या दंगलीत बोटचेपी भूमिका घेतली आसती, तर मुंबईतला हिंदू जिवंत राहिला नसता. त्याच बाळासाहेबांचे वारसदार अमरावती, नांदेड, मालेगाव मध्ये झालेल्या घटनेवर काहीही बोलणार नाहीत. अन् शनिवारच्या उत्स्फूर्त प्रतिक्रियेमध्ये भाजपाचा हात आहे, असे म्हणत असतील तर ठिक आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

# कार अपघातात एकाचा मृत्यू

वार्ताहर/**गोंदिया**

फिरायला गेलेल्या तिघाजणांना भरधाव आर्टिका वाहनाने चिरडल्याची घटना तुमसर-तिरोडा मार्गावरील पटले पेट्रोल पंपाजवळ पहाटे ५च्या सुमारास घडली. या दुर्घटने निखिल राजू उपरकर (३१) रा. भूतनाथ वार्ड तिरोडा याचा मृत्यू झाला तर नेहा राजू उपरकर (३०) राजू हरीलाल उपरकर (६०) हे जखमी झाले आहेत.

निखिल, नेहा व राजू हे तिघेही नेहमीप्रमाणे पहाटेच्या सुमारास तुमसर-तिरोडा मार्गावर असलेल्या पटले पेट्रोल पंप परिसरात फिरायला गेले होते. दरम्यान तुमसरकडून तिरोडाकडे येणाऱ्या आर्टिका गाडीने त्यांना पाठीमागून जोरदार धडक दिली. यात तिघेही जखमी झाले. दरम्यान, निखिल यांना तिरोडा उपजिल्हा रुग्णालयात नेले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. तर, नेहा व राजू यांना उपचारानंतर घरी पाठविण्यात आले. भास्कर उपरकर (५४) रा. तिरोडा यांनी दिलेल्या तक्रारीवरून तिरोडा पोलिसांनी वाहनचालक प्रणय मकेश उके याच्या विरोधात गुन्हा नोंद केला आहे.

# सिटी लिंक बसमध्ये गुंडांचा हैदोस

**नाशिक :** महापालिकेच्या सिटीलिंक शहर बसमध्ये महिलेसह तिच्या साथीदारांनी हैदोस घालून वाहकासह चालकाला जबर मारहाण केल्याची घटना घडली आहे. हा संपूर्ण प्रकार बसच्या सीसीटीव्हीत कैद झाला असून म्हसरूळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. बसचालक गोकुळ काकड (२७) आणि वाहक यांना मारहाण करण्यात आलेली आहे. आमच्या गाडीला ओव्हरटेक का केले याचा जाब विचारत संशयित महिला आणि तिच्या साथीदारांनी बस अडवली. तसेच बसमध्ये घुसून चालकाशी वाद घालून मारहाण केली.

# रेल्वेत कार्यरत महिलेची वरिष्ठांविरोधात तक्रार

वार्ताहर/**नागपूर**

नागपूर रेल्वेतील एका महिला अधिकाऱ्याने आपल्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधात छेडखानी आणि जातिवाचक शिविगाळी केल्याबद्दलची तक्रार सदर पोलिसात केली असून पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक विकास कुमार कश्यप आणि सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक अविनाश कुमार आनंद अशी गुन्हा दाखल झालेल्या अधिकाऱ्यांची नावे आहेत.

सदर पोलीस ठाण्याअंतर्गत दक्षिण पूर्व मध्ये रेल्वेचा विभाग येतो. तक्रारकर्ती महिला अधिकारी ५७ वर्षांची आहे. पीडितेने दिलेल्या तक्रारीनुसार, वरील दोन्ही अधिकारी त्यांना वारंवार कॅबीनमध्ये बोलावित होते. जातीवाचक शिविगाळ करून छेडछाड करीत होते. याविरोधात आवाज उचलला असता सदर महिला अधिकाऱ्यास आणखी त्रास देणे सुरु केले. फाईल मागण्याच्या बहाण्याने बोलावून त्रास दिला जात असल्याची महिलेची तक्रार आहे. या महिला अधिकाऱ्याने ऑगस्ट २०२१ मध्येच याची लेखी तक्रार सदर पोलिसांत केली होती. तक्रारीची चौकशी करण्यात आली. त्यानंतर सदर पोलिसांनी आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक भारती गुरनुले तपास करत आहेत.

**गिर्यारोहण क्षेत्रातील वैनतेय संस्थेची उल्लेखनीय कामगिरी**

# गिर्यारोहकांनी सर केला 'अंगठ्यांचा डोंगर'

वार्ताहर/**नाशिक**




नाशिक जिल्ह्यातील मनमाड जवळ असलेल्या सातमाळ पर्वत रांगेतील अंकाई-टंकाई, गोरक्षगड तसेच कातरा किल्ला यांच्या समोरील बाजूस हाडबीची शेंडी हा सुळका दिमाखात उभा आहे. हा सुळका अंगठ्याच्या प्रतिकृतीसारखा असल्यामुळे याला अंगठ्याचा डोंगरसुद्धा म्हटले जाते. अतिशय अवघड असा हा सुळका नाशिकच्या गिरिभ्रमण आणि गिर्यारोहण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या वैनतेय संस्थेच्या गिर्यारोहकांनी सर केला.

हाडबीची शेंडी या सुळक्याची उंची १२० फूट असून गिर्यारोहणाच्या श्रेणीनुसार या सुळक्याचे आरोहण मध्यम ते कठीण प्रकारात मोडते. सुळका तीन टप्प्यात सर करावा लागतो. त्यात पहिला आणि दुसरा टप्पा मध्यम आणि शेवटचा टप्पा अवघड श्रेणीत मोडतो. सुळक्यावरील स्तर खूपच सैल असल्यामुळे चढाई जिकरीची आणि आव्हानात्मक होती. सुळका सर करण्यासाठी प्रथम आरोहक गौरव जाधव याने सुरुवात केली. त्यापाठोपाठ रोहित हिवाळे याने प्रथम आरोहकास बीले दिले. सुळका सर करण्यासाठी चोक नट तसेच जुन्या प्रसारणात्मक खिळ्यांचा वापर केला. त्यानंतर विद्या अहिरे आणि पृथ्वीराज शिंदे यांनी आरोहण करून सुळक्याचा माथा गाठला. पृथ्वीराज शिंदे यांनी ड्रोनच्या सहाय्याने आजूबाजूचे आणि सुळक्याचे चित्रीकरण केले. सुळक्यावरून उतरताना तेथे असलेल्या मेखेचा आणि खडकाचा आधार घेऊन रॅपलिंग करून चारही गिर्यारोहक माथ्यावरुन खाली उतरले. वैनतेय संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे या मोहिमेला मार्गदर्शन लाभले.

NYKAA

FSN E–COMMERCE VENTURES LIMITED

(formerly known as FSN E-Commerce Ventures Private Limited)
CIN: U52600MH2012PLC230136
**Regd.Office**: 104, Vasan Udyog Bhavan, Sun Mill compound, Tulsi Pipe Road, Lower Parel, Mumbai - 400013.
**Email id**- investor-relation@nykaa.com

**EXTRACT OF CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND SIX MONTHS ENDED 30TH SEPTEMBER, 2021**

(Rs in Million, unless otherwise stated)

| Sr. No. | Particulars | Quarter ended 30th September, 2021 | Quarter ended 30th September, 2020 | Six Months ended 30th September, 2021 |
|---|---|---|---|---|
| | | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) |
| 1 | Total Income | 8,904.62 | 6,048.98 | 17,121.75 |
| 2 | Profit / (Loss) before tax | 13.65 | 326.40 | 45.14 |
| 3 | Profit / (Loss) after tax | 11.72 | 269.88 | 46.94 |
| 4 | Total Comprehensive Income/ (Loss) | 12.26 | 269.88 | 49.57 |
| 5 | Paid-up equity share capital | 467.33 | 147.33 | 467.33 |
| | Face value (In Rs.) (Refer Note 3) | 1.00 | 10.00 | 1.00 |
| 6 | Other Equity as shown in the Audited Balance sheet of previous year | | | 4,748.39 |
| 7 | Earnings / (Loss) per equity share of face value of Re. 1/- each (not annualised) | | | |
| | Basic (In Rs) | 0.03 | 0.62 | 0.10 |
| | Diluted (In Rs) | 0.03 | 0.60 | 0.10 |

**Notes:**

1. The above is an extract of the detailed format of financial results filed with the stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The Full format of the Financial results are available on the stock Exchange websites. (www.bseindia.com and www.nseindia.com) and on company's website (www.nykaa.com)
2. Financial results of FSN E-Commerce Ventures Limited (formerly known as FSN E-Commerce Ventures Private Limited) standalone:

(Rs in Million)

| Sr. No. | Particulars | Quarter ended 30th September, 2021 | Quarter ended 30th September, 2020 | Six Months ended 30th September, 2021 |
|---|---|---|---|---|
| | | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) |
| 1 | Total Income | 699.62 | 552.24 | 1,323.72 |
| 2 | Profit / (Loss) before tax | 232.53 | 113.80 | 484.89 |
| 3 | Profit / (Loss) after tax | 182.56 | 93.79 | 380.96 |

3. Pursuant to the approval of the shareholders in their meeting held on 16 July, 2021, the Company, on 22 July, 2021, sub-divided one equity share of face value of Rs. 10 each into ten equity shares of face value of Rs. 1 each and allotted 311,357,900 ordinary shares of face value of Rs. 1 each as fully paid-up bonus shares in proportion of two bonus shares for every one existing fully paid-up equity share of face value of Rs. 1 each held as on the Record Date i.e. 15 July, 2021.
4. The above financial results have been reviewed and recommended by the Audit Committee and have been approved and taken on record by the Board of Directors at its meeting held on 14th November, 2021.
5. The review/audit as required under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations. 2015 has been completed by the statutory auditors of the company except financial results for the three months and six months period ended September 30, 2020 which have not been subjected to limited review or audit.

For and on Behalf of Board of Directors of
**FSN E-Commerce Ventures Limited**
**(formerly known as FSN E-Commerce Ventures Private Limited)**

**Place**: Mumbai
**Date**: 14th November, 2021

**Falguni Nayar**
Executive Chairperson, CEO & Managing Director